(16)

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

राहुरी ४१३ ७२२ जिल्हा - अहमदनगर

Registered A. D.

जा.क्र. विद्या-८/मान्यता/ २/४/ /२०००

दिनांक : 30 SEP 2000

प्रति,

अध्यक्ष

निनाई देवी शिक्षण प्रसारक मंडळ, कोकरुड,

मु.पो. कोकरुड, ता. शिराळा, जिल्हा-सांगली.

**विषय :** कृषि विद्यापीठांतर्गत संलग्न खाजगी संस्थेमार्फत विनाअनुदान तत्वावरील कृषि व संलग्न विषयातील निम्नश्रेणी पदविका/प्रमाणपत्र पाठ्यक्रम सुरु करण्यास मान्यता...

**संदर्भ :** या कार्यालयाचे पत्र क्र. विद्या-८/मान्यता/७९६७/२०००
दिनांक : १४ सप्टेंबर, २०००

**महाशय,**

वरील विषयानुसार आपणास कळविणेत येते की, निम्नस्तर कृषि शिक्षण क्षेत्रातील कृषि पदविका या अभ्यासक्रमास आपल्या संस्थेस खालील अटीस अधिन राहून सुरु करण्यास कार्यकारी परिषद दिनांक ८/९/२००० रोजी झालेल्या सभेतील ठरावानुसार मान्यता देत आहे.

१. हा अभ्यासक्रम विना अनुदान तत्वावर आहे.

२. अभ्यासक्रम शिकविण्यासाठी विद्यापीठाच्या निकषाप्रमाणे योग्य ती अर्हताप्राप्त असलेल्या कर्मचाऱ्यांची विद्यापीठाच्या सहमतीने त्वरीत नेमणूक करावी व तसे विद्यापीठास कळवावे.

३. अभ्यासक्रमासंबंधीत आवश्यक साधनसामुग्री उदा. प्रयोगशाळा, साहित्य, फर्निचर, विद्यार्थी/ विद्यार्थीनींसाठी वसतीगृह इ. बाबींची पुर्तता करावी व तसे विद्यापीठाचे निदर्शनास आणावे.

४. संस्थेने दरवर्षी विद्यापीठाच्या तांत्रिक सहकार्याने एक शेतकरी मेळावा आयोजीत करावा व त्यासाठी येणारा सर्व खर्च आपल्या संस्थेने करावयाचा आहे.

५. अट क्र. २ व ३ बाबत विद्यापीठाच्या निकषाप्रमाणे व प्रमाणकानुसार आवश्यक असणाऱ्या बाबीं पूर्ण केल्या अथवा नाही याबाबतची खात्री विद्यापीठाची चौकशी समिती सदर मान्यता पत्र मिळाल्यापासून तीन महिन्यानंतर केव्हांही करेल. चौकशी समितीस सदर बाबी पूर्ण केल्या नाहीत याची खात्री झाली तर आपल्या संस्थेनेप्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या विहीत परिक्षेस बसता येणार नाही व याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या संस्थेची राहील.

६. सदरच्या अभ्यासक्रमाची मान्यता प्रारंभी शैक्षणिक वर्ष २०००-२००१ ते २००१ - २००२ या दोन वर्षासाठी असेल, तदनंतर नुतनीकरणासाठी पुन्हा प्रस्ताव सादर करावा लागेल.

७. आपल्या संस्थेमार्फत सुरु केल्या जाणाऱ्या कृषि पदविका या अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ६० ( साठ फक्त) इतकी विद्यार्थ्यांची राहील.

...२..

८. या विद्यापीठाच्या प्रचलीत नियमानुसार हा अभ्यासक्रम चालू ठेवण्यास आवश्यक त्या सुविधा सातत्याने उपलब्ध असणे आवश्यक आहे. अन्यथा अभ्यासक्रम रद्द करण्यासंबंधी विद्यापीठ विचार करील, विद्यापीठाच्या अंतीम आदेशाला दिलेल्या आव्हानाचा ( अपील )विचार केला जाणार नाही.

९. आपल्या संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीची / शैक्षणिक गुणवत्तेची पहाणी करण्यासाठी विद्यापीठाची समिती अचानक केव्हांही आपल्या संस्थेस भेट देईल, नियमानुसार सदर समितीचा प्रवास भत्ता व दैनंदिन भत्त्याचा खर्च आपल्या संस्थेला करावा लागेल.

१०. संस्थेने वेळोवेळी प्रवेशासंबंधीचे विद्यापीठाच्या प्रचलीत नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास आपल्या संस्थेकडील अभ्यासक्रमाची मान्यता रद्द करण्यात येईल.

११. विद्यार्थांकडून या अभ्यासक्रमाचे शासनाने विहित केलेले शुल्क प्रतिवर्षी रुपये ७५००/- आकारण्यात यावे. विहित केलेल्या शुल्कापेक्षा जादा शुल्क, देणगी अथवा अन्य रुपाने रक्कम घेऊ नये, यासंबंधी तक्रारी आल्यास विद्यापीठ स्तरावर चौकशी करण्यात येईल व त्यावर विद्यापीठ स्तरावरुन संस्थेविरुध्द योग्य ती कारवाई करणेत येईल.

१२. उपरोक्त ७ मधील एकूण प्रवेश क्षमतेच्या १० टक्के व्यवस्थापन कोटा राखीव म्हणून ठेवला जाईल.

१३. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवाराची नोकरीसंबंधी अथवा पुढील उच्च शिक्षणाची, अर्हतेबाबतची जबाबदारी विद्यापीठावर राहणार नाही.

१४. विद्यापीठाने मान्यता दिल्याखेरीज संस्था कृषि विद्यालयांसाठी वापरात असलेल्या इमारतीमध्ये वा परिसरात दुसरा कोणताही अभ्यासक्रम सुरु करणार नाही. असे हमीपत्र रुपये १००/- च्या स्टँप पेपरवर लिखीत स्वरुपात संस्थेला या विद्यापीठाकडे सादर करावे लागेल.

१५. हा अभ्यासक्रम चालविणेसंदर्भात विद्यापीठाने वेळोवेळी विहित केलेल्या अटी व नियम संस्थेस बंधनकारक राहील.

१६. विद्यापीठाने मान्यता दिलेल्या कालावधीपूर्वी सदरचा अभ्यासक्रम विद्यापीठाचे पूर्वपरवानगीशिवाय बंद करता येणार नाही अथवा विद्यार्थी परस्पर इतर संस्थेकडे वर्ग करता येणार नाही.

१७. कोणत्याही प्रकारचे न्यायालयीन खटले/प्रकरणे, प्रवेशाबाबत किंवा इतर बाबतीत, संस्था हाताळील अशा प्रकरणास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१८. कृषि पदविका अभ्यासक्रमाचा दर्जा उच्चतम राखण्याच्या दृष्टीने कृषि विद्यापीठ/ महाविद्यालयांच्या प्राध्यपकांचा उपयोग करुन घ्यावा व त्यासाठी त्यांना योग्य ते मानधन द्यावे.

१९. विद्यार्थ्यांनी दोन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर संस्थेने कृषिवर आधारित उद्योगाशी संपर्क साधून अशा विद्यार्थ्यांना सहा महिने कालावधीसाठी सदर संस्थेकडे प्रशिक्षणार्थी म्हणून पाठवावे. प्रशिक्षण कालावधी समाधान-कारक पूर्ण केला असे प्रमाणित केल्यानंतरच विद्यापीठाचे पदविका प्रमाणपत्र देण्यात येइल.

आपला विश्वासू

**( पुरुषोत्तम भापकर )**

कुलसचिव

**प्रत : माहितीसाठी व पुढील कार्यवाही रवाना**

१. सह. अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, पुणे/धुळे/कोल्हापूर
२. सह. अधिष्ठाता ( नि.कृ.शि. ), मफुकृवि, राहुरी
३. नियंत्रक, मफुकृवि, राहुरी,
४. प्राधिकरण शाखा, मफुकृवि, राहुरी
५. अधिषक कृषि विद्यालय,
६. टेबल नं. १०, विद्या शाखा, मफुकृवि, राहुरी